## MMRDA takes preventive measures at headquarters for COVID-19

The Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA) has initiated steps to curtail the onslaught of COVID-19, also infamously known as Corona Virus. The Authority has taken sanitary measures in its BKC headquarters of the government institution to ensure safety of its staff and visitors.

MMRDA has installed wash basins with hand-wash liquid soap at the entrance of the headquarters. Each visitor and staff member has to wash their hands before boarding the elevator for their respective work. The department heads have also been instructed to keep their cabin doors open to avoid constant touch on door handles. Moreover, an expert doctor of a government hospital was called over at the headquarters to deliver the message of preventive measures to avoid the spread of virus.

All the heads of their respective department are requested to share precautions to be followed by the team. Should there be any symptoms present, the person should be asked to work from home as a precautionary measure. The information technology cell will help enable all such staff members to work remotely.

RA Rajeev, Metropolitan Commissioner, MMRDA, said the Authority takes health measures seriously and cares for its staffers and visitors. "At a vulnerable situation such as this, it is our responsibility to lead from the front. This is the least one can do to safeguard the members of the institution. If every institution takes the preventive measures appropriately, it will help mitigate the pandemic that Corona Virus is. Prevention is the best cure. All the best to everyone. We care for everyone. Take good care of yourself and your family members," the commissioner added.

## कोरोनासंदर्भात एमएमआरडीए मुख्यालयात घेतली जातेय खबरदारी

एमएमआरडीएने कोरोना संदर्भात प्रतिबंधात्मक पावलं उचलली आहेत. एमएमआरडीएचे कर्मचारी आणि बाहेरून कामासाठी येणाऱ्या लोकांच्या सुरक्षेसाठी प्राधिकरणाने बीकेसीच्या मुख्यालयात कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या आहेत.

एमएमआरडीएने मुख्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ लिक्विड साबणासह वॉश बेसिन बसविल्या आहेत. मुख्यालयात बाहेरून कामासाठी येणाऱ्या व्यक्ती तसेच मुख्यालयातील कर्मचारी यांनी आत येताना लिफ्टमध्ये जाण्याआधी स्वच्छ हात धुवावेत. दरवाज्याला सतत लोकांना स्पर्श करायला लागू नये म्हणून केबिनचे दरवाजे उघडे ठेवण्याच्या सूचनाही विभाग प्रमुखांना देण्यात आल्या आहेत. याशिवाय कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी काय प्रतिबंधात्मक उपाययोजना करायच्या हा योग्य संदेश पोहचवणं गरजेच आहे. त्यासाठी एमएमआरडीएच्या मुख्यालयात शासकीय रुग्णालयातील तज्ञ डॉक्टरांना बोलवण्यात आलं होतं.

डॉक्टरांच्या मार्गदर्शनानुसार कोरोनासंबंधी सावधगिरी बाळगण्याचे आवाहन सर्व विभागाच्या प्रमुखांनी सर्व टीमला केले आहे. जर कोणाला कोरोनाची लक्षणं वाटू लागली तर त्यांनी तब्येतीची जोखीम न उचलता सावधगिरीसाठी घरून काम करण्यासाठी विचारणा करावी. त्यासाठी एमएमआरडीएचा माहिती व तंत्रज्ञान विभाग (आयटी सेल) त्या कर्मचाऱ्याला घरून काम करण्यास मदत करेल.

एमएमआरडीएचे महानगर आयुक्त आर. ए. राजीव म्हणाले, प्राधिकरण आरोग्यविषयक उपाययोजनांकडे गांभीर्याने पाहतं. आम्ही कर्मचारी आणि कामासाठी मुख्यालयात येणाऱ्या लोकांची काळजी घेत आहोत. 'कोरोनाने जगाला विळखा घातला आहे अश्या परिस्थितीत आपण कर्मचाऱ्यांच्या आणि लोकांच्या आरोग्याच्या सुरक्षितेसाठी पुढाकार घेणं ही आपली जबाबदारी आहे. आपण आपल्या संस्थेच्या कर्मचाऱ्यांसाठी आणि सामान्य लोकांसाठी एवढ्या उपाययोजना करूच शकतो. प्रत्येक संस्थेने योग्य प्रकारे प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या तर कोरोनासारख्या साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव कमी होईल. उपचारापेक्षा सावधगिरी बाळगणे हे केव्हाही चांगले. आम्ही एमएमआरडीएमधल्या सर्वांची काळजी घेत आहोत. तुम्हीही स्वतःची आणि आपल्या कुटुंबाची काळजी घ्या असं आवाहन आयुक्त आर. ए. राजीव यांनी केलं.